# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते.मो - 9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ७४ वा मंगळवार दि.२० ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## झारखंडमध्ये भाजपचा 'शिंदे पॅटर्न'!



रांची : वृत्तसंस्था झारखंडमधील राजकारण सध्या देशाच्या केंद्रस्थानी आले आहे. माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांनी सत्ताधारी झारखंड मुक्ती मोर्चा पक्ष सोडण्याचे संकेत दिले आहेत. त्यांनी एक निवेदन जाहीर करून आपल्यासमोर तीन पर्याय असल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे ते कोणता मार्ग पत्करतात याबाबत उत्सुकता आहे.

चंपाई सोरेन यांनी म्हटले की, मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा घेताना त्यांच्यासोबत अपमान झाला. आता त्यांच्यासमोर फक्त तीन पर्याय आहेत. एक, राजकारणातून निवृत्ती घेणे, दुसरा, स्वत:ची संघटना सुरु करणे आणि तिसरा दुस-या एखाद्या संघटनेसोबत जाणे. यातील तिसरा पर्याय ते अवलंबवण्याची दाट शक्यता आहे.

भाजपमध्ये जाण्यात दोन अडचणी

१. झारखंडमध्ये भाजप दुस-या क्रमांकाचा पक्ष आहे. चंपाई सोरेन यांचा दिल्ली दौरा देखील झाला. पण, भाजपमध्ये आधीच तीन माजी मुख्यमंत्री रांग लावून असल्याने भाजप त्यांना मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून प्रोजेक्ट करेल काय? याबाबत प्रश्न आहे.

२. मुख्यमंत्री हेमंत सोरेन वारंवार भाजपवर पक्ष फोडण्याचा आरोप करत आहेत. चंपाई सोरेन भाजपमध्ये गेल्यास त्यांच्या या आरोपाला बळकटी मिळेल. विधानसभेसाठी हेमंत सोरेन यांना हा चांगला मुद्दा मिळू शकतो. मात्र, चंपाई सोरेन यांना पक्षात घेऊन भाजप त्यांना केंद्रात घेऊ शकते. त्यांना एका राज्याचा राज्यपाल देखील केले जाऊ शकते.

चंपाई हे कोल्हान भागातील प्रमुख नेते आहेत. २०१९ मध्ये याठिकाणी झामुमोला १४ पैकी ११ जागा मिळाल्या होत्या. दरम्यान, चंपाई सोरेन यांची राजकीय कारकीर्द शिबू सोरेन यांच्या सानिध्यातच झाली. त्यांनी पहिल्यांदा १९९१ मध्ये विधानसभेची निवडणूक लढवली होती. त्यानंतर २००० सोडले तर ते नेहमी जिंकत आले आहेत. त्यांनी राज्यात मंत्रिपद देखीस सांभाळले आहे. झामुमोमधील ते प्रमुख नेते आहेत. त्यामुळे त्यांना हेमंत सोरेन तुरुंगात गेल्यानंतर मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली होती.

महाराष्ट्राप्रमाणे शिंदे पॅटर्न! चंपाई सोरेन यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांच्यासमोर नवा पक्ष स्थापन करण्याचा देखील पर्याय आहे. झामुमो आणि काँग्रेसमधील नाराज नेत्यांना घेऊन ते स्वत:चा पक्ष स्थापन करू शकतात. स्वत:चा पक्ष घेऊन ते विधानसभा लढले तर ते किंगमेकरच्या भूमिकेत जाऊ शकतात.अशावेळा महाराष्ट्राप्रमाणे शिंदे फॉर्म्युलानुसार त्यांना मुख्यमंत्री केले जाऊ शकते.

## मनोज जरांगेंच्या आरोपात तथ्य नाही




मुंबई : मराठा आरक्षणावरून मनोज जरांगे सातत्याने देवेंद्र फडणवीसांना टार्गेट करतात. त्यात फडणवीसांमुळे मुख्यमंत्री शिंदेंना आरक्षण देता येत नाही असे विधान त्यांनी केले. त्यावरून देवेंद्र फडणवीसांनी यावर एकनाथ शिंदेंनी उत्तर द्यावे असे म्हटले होते. त्यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही याबाबत खुलासा करत मनोज जरांगे यांनी केलेल्या आरोपात तथ्य नसल्याचे म्हटले आहे.

मुंबईत पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी म्हटले की, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी मी, देवेंद्र फडणवीस, अजित पवार एकत्र बसलो. आरक्षणासाठी विशेष अधिवेशन बोलावले. प्रत्येक बैठकीला देवेंद्र फडणवीस होते. मराठा आरक्षणासाठी जो कायदा केला त्यात फडणवीसांची मोलाची भूमिका होती. अजित पवारही सहभागी होते. मनोज जरांगेंच्या मागणीनुसार मराठवाड्यात ज्यांच्या कुणबी नोंदी ते आम्ही देऊ लागलो. मराठा समाजाला ज्या सवलती होत्या त्या दिल्या. मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले त्याला विरोध करायला कोर्टात कोण गेले ते आधी बघा असे त्यांनी सांगितले. तसेच मराठा आरक्षण मिळू नये यासाठी विरोधी पक्षाचा हात आहे. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांच्या कारकिर्दीत मराठा समाजाला आरक्षण देण्याचं काम झालेले. तेव्हा मीही कमिटीत होतो. देवेंद्र फडणवीस मराठा आरक्षणाला विरोध करतायेत हे पूर्णपणे चुकीचे आहे. मनोज जरांगे यांच्या आरोपात तथ्य नाही. आम्ही जो काही निर्णय घेतो तो सर्वानुमते घेतो असं सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची पाठराखण केली.

काय म्हणाले होते देवेंद्र फडणवीस? राज्याचे सगळे अधिकार हे मुख्यमंत्र्यांकडे असतात. इतर सर्व मंत्री मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या अधिकारावर काम करत असतात. एकनाथ शिंदे आणि मी एकत्रित काम करतो. शिंदेंना पूर्ण पाठबळ आणि पाठिंबा माझा आहे. त्यामुळे जरांगेंनी केलेल्या आरोपावर एकनाथ शिंदेंनी उत्तर द्यावे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षणासाठी कुठलाही प्रयत्न केला आणि मी तो थांबवला असे शिंदेंनी सांगितले तर त्याच क्षणी मी माझ्या पदाचा राजीनामा देईन आणि राजकारणातून निवृत्त होईन. आजपर्यंत मराठा समाजासाठी जे काही निर्णय झाले ते एकतर मी केले नाहीतर शिंदेंनी केले. एकनाथ शिंदेंच्या पाठिशी मी भक्कपणाने उभा राहिलो आहे. परंतु अशाप्रकारे जाणीवपूर्वक नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न अतिशय अयोग्य आहे असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले होते.

## युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताने बनवले 'कामिकाजे ड्रोन'!



नवी दिल्ली : वृत्तसंस्था रशिया-युक्रेन आणि इराण-लेबनॉन, इस्त्राईल-पॅलेस्टाईन यांच्यात सुरू असलेले दोन युद्ध पाहून भारतीय वैज्ञानिकांनी एका घातक अस्त्राची निर्मिती केली आहे. भविष्यात युद्धाचा परिणाम बदलण्याची या शस्त्राची ताकद आहे. भारतीय वैज्ञानिकांनी कमी काळात हे अस्त्र बनवले आहे. इस्त्रोची सुद्धा या शस्त्राच्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका आहे.

जगाच्या पाठिवर सुरु असलेले हे युद्ध पाहून भारताने सुद्धा एक घातक अस्त्र तयार केले. त्याचे नाव आहे 'कामिकाजे ड्रोन'. भारताची एलिट संशोधन संस्था नॅशनल एरोस्पेस लॅबोरेटरीजने 'कामिकाजे ड्रोन' विकसित केलंय.

स्वदेशी बनावटीचे इंजिन या ड्रोनमध्ये असून १,००० किलोमीटर अंतरापर्यंत हल्ला करण्याची या ड्रोनची क्षमता आहे. 'एनएएल'चे संचालक अभय पाशिलकर यांच्या नेतृत्वाखाली या घातक ड्रोनची निर्मिती करण्यात आली आहे. हे कमी खर्चिक, मानवरहीत परिणामकारक हवाई वाहन आहे. एका ठराविक उंचीवरुन हे कामिकाजे ड्रोन उड्डाण करते. स्फोटक वाहून नेणारे हे ड्रोन टार्गेट जवळ काही वेळ भ्रमण करु शकते. टार्गेटला धडकल्यानंतर मोठा विस्फोट होतो. कमांड सेंटरमधून हे ड्रोन कंट्रोल करता येते.

३० एचपी वँकेल इंजिनमुळे हे ड्रोन १०० ते १२० किलो वजन वाहून नेऊ शकते. यामध्ये ३० ते ४० किलोंची स्फोटक आहेत. 'एनएएल' ही संस्था 'सीएसआयआर'ची घटक आहे. १९५९ साली 'सीएसआयआर'ची स्थापना झाली. दुस-या महायुद्धापासून कामिकाझे ड्रोनची संकल्पना अस्तित्वात आली. जपानी वैमानिक शत्रूच्या टार्गेटवर थेट आपलं विमान धडकवायचे. यात मानवी जीवाचे सुद्धा नुकसान व्हायचे.

आता कामिकाजे ड्रोनमुळे शत्रुची वित्तहानी, जिवीतहानी होईल पण आपले मानवी नुकसान होणार नाही. कारण हे मानवरहीत ड्रोन्स आहेत. कामिकाजे ड्रोनचे वैशिष्टय म्हणजे 'जीपीएस' चालत नाहीत, अशा ठिकाणी सुद्धा ही ड्रोन्स काम करतात. इस्त्रोने विकसित केलेली 'एनएव्हीआयसी' सिस्टिम या ड्रोन्समध्ये आहे. त्यामुळे 'जीपीएस' सिग्नल जॅम असलेल्या भागात सुद्धा हे ड्रोन्स आपले काम अचूकतेने करतात.

## मुख्यमंत्री सिध्दरामैय्यांवरील अटकेची कारवाई टळली

बंगळूरू : कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धारामैय्या यांना उच्च न्यायालयाने सोमवार दि. १९ ऑगस्ट रोजी मोठा दिलासा दिला असून जमिनीशी संबंधित भ्रष्टाचाराच्या प्रकरणात सिद्धारामैय्या यांच्यावर सध्यातरी अटकेची कारवाई होणार नसल्याचे आदेश जारी केले आहेत.



जोपर्यंत या प्रकरणाची सुनावणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत सिद्धारामैय्या यांच्यावर कुठलीही कारवाई करण्यात येऊ नये, तोपर्यंत या प्रकरणाला स्थगित ठेवावे असे कर्नाटक उच्च न्यायालयाने एमपी-एमएलए कोर्टाला दिलेल्या आदेशात म्हटले आहे. न्यायमूर्ती एम. नागप्रसन्ना यांनी सिद्धारामैय्या यांनी केलेल्या अपिलावर सुनावणी करताना हा अंतरिम आदेश दिला आहे. कर्नाटकच्या राज्यपालांनी सिद्धारामैय्या यांच्याविरोधात खटला चालविण्यास दिलेल्या परवानगीविरोधात सिद्धारामैय्या यांनी उच्च न्यायालयामध्ये दाद मागितली होती. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी ही २९ ऑगस्ट रोजी होणार आहे. हायकोर्टाने हे आदेश देताना सांगितले की, या या प्रकरणाची सुनावणी ही या कोर्टामध्ये सुरू आहे. तसेच युक्तिवादही अद्याप पूर्ण झालेला नाही. त्यामुळे पुढील सुनावणीपर्यंत संबंधित कोर्टाने आपली कारवाई स्थगित ठेवावी. तसेच या प्रकरणी तोपर्यंत कुठलीही कारवाई होणार नाही. कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गहलोत यांनी तीन लोकांनी केलेल्या तक्रारींवरून सिद्धारामैय्या यांच्याविरोधात तपासाला मान्यता दिली होती.


## उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे - विरोळे यांनी आठ उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांचा केला गौरव

लातूर :- लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांच्यासह आठ जणांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी म्हणून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते महसूलदिनी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते. त्या आठ जणांची उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे - विरोळे यांनी दखल घेऊन त्यांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या. लातूर जिल्हा अधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांच्या हस्ते तहसीलदार सौदागर तांदळे यांना उत्कृष्ट तहसीलदार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार सुधीर देशमुख, महसूल सहाय्यक ओमप्रकाश कुमारराव मेहकरे, तर लातूरतहसील कार्यालयातील मंडळ अधिकारी रामराव झाडे, अव्वल कारकुन बाशीद शेख, तलाठी मल्लिकार्जून माशाळे, शिपाई श्रीमती लामतुरे व कोतवाल यशपाल कांबळे यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करून महसूल दिनी गौरविण्यात आले होते. यांनी सन २०२३-२४ मध्ये केलेल्या उल्लेखनीय आणि प्रशंसनीय कार्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.




तहसीलदारासह आठ अधिकारी कर्मचारी यांना त्यांच्या कामाची दखल उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे - विरोळे यांनी घेतल्यामुळे हा पुरस्कार आम्हा आठ जणांना मिळाला अशी कृतज्ञता संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यावेळी व्यक्त केली.

## महाराष्ट्रातील निवडणुका लांबणीवर का? संजय राऊतांनी केला 'हा' दावा



महाराष्ट्र आणि झारखंडमधील निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या आहेत, कारण भाजपचा लाडका भाऊ योजनेच्या माध्यमातून मतदान विकत घेण्याचा डाव आहे. झारखंडमध्येही भाजपला हेमंत सोरेन यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवायचे आहे, असा दावा शिवसेना ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी केला आहे. सोमवारी (दि. १९) माध्यमांशी ते बोलत होते. राज्यात विधानसभेची निवडणूक दिवाळीनंतरच होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना खासदार संजय राऊत म्हणाले की, भाजपला झारखंडमध्ये हेमंत सोरेन यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवून त्यांचा पक्ष तोडायचा आहे.

## जळकोट तालुक्यातील पीक नुकसानीची ना. संजय बनसोडे यांनी केली पाहणी

**नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार**



लातूर :- जळकोट तालुक्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जावून पाहणी केली. तसेच या नुकसानीचे पंचनामे करून त्याबाबतचा अहवाल तातडीने सादर करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या. उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार सुरेखा स्वामी, गट विकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहूल केंद्रे, तालुका कृषि अधिकारी आकाश पवार यांच्यासह शेतकरी यावेळी उपस्थित होते.

केकत शिंदगी, होकर्णा, वडगाव येथील पीक नुकसानीची पाहणी केल्यानंतर ना. बनसोडे यांनी वडगाव येथील हनुमान मंदिरात शेतकरी, नागरिकांशी संवाद साधून नुकसानीची माहिती घेतली. पावसामुळे पिकांचे, रस्त्यांचे नुकसान झाल्याची माहिती यावेळी शेतकऱ्यांनी दिली. तसेच सुमारे आठ ते नऊ गावांमध्ये साडेतीन ते चार हजार हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन, कापूस, मूग आदी पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असल्याचे तालुका कृषि अधिकारी श्री. पवार यांनी सांगितले नुकसानीची माहिती मिळताच दूरध्वनीद्वारे प्रशासनाला पीक नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले होते. आज प्रत्यक्ष पाहणी करताना शेतपिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिसून आले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी नुकसान पंचनाम्याचा अहवाल त्वरीत शासनाला सादर करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले. तसेच शेतकऱ्यांना सरसकट मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# ‘नायब’ निवृत्तीचा निर्णय

जम्मू काश्मिरात सर्व कसे सुरळीत आहे हे दाखवण्यास केंद्र उत्सुक असेल. पण पूर्ण राज्याचा दर्जा देणे हे सुरळीतपणाचे प्रमाण ठरेल पंतप्रधानांनी ‘एक देश, एक निवडणूक’ या संकल्पनेचा पुनरुच्चार करून चोवीस तास उलटत नाहीत तोच आयोगाने चार राज्यांसाठी दोन स्वतंत्र निवडणूक कार्यक्रम उघड केले. त्यानुसार जम्मू-काश्मीर आणि हरियाणा या राज्यांच्या निवडणुका लगेच सप्टेंबरात होऊन ऑक्टोबराच्या पहिल्या आठवड्यात त्यांचे निकाल लागतील. दुसऱ्या टप्प्यात दीपावलीनंतर महाराष्ट्र आणि झारखंड या राज्यांत निवडणुका होतील. अशा विभागणीतून या यंत्रणेच्या स्वायत्ततेचे दर्शन घडते असे लाडक्या भोळ्या-भाबड्या भक्तगणांस वाटत असल्यास त्यांचा आनंद हिरावून घेण्याचा अधिकार ‘इंडिया’स नाही. आयोगाने असे केले त्यात अर्थातच श्रेष्ठींची सोय आहे. त्यामागे दोन प्रमुख कारणे भक्तेतरांस दिसतील. एक म्हणजे एकाचवेळी अधिकाधिक ठिकाणी श्रेष्ठींस प्रचारात झोकून देता यावे हा. दुसरा मुद्दा आयोगाच्या स्त्रीदाक्षिण्याचा. निवडणुका लांबविल्यास महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींची रक्षाबंधनास सुरू झालेली ओवाळणी भाऊबीजेपर्यंत लांबवता येणे आणि झारखंडाच्या मुख्यमंत्र्यांमागे आणखी काही शुक्लकाष्ठे लावण्यास अधिक मुभा मिळणे. हे झाले आयोगाने न घेतलेल्या निर्णयाचे विश्लेषण. आता घेतलेल्या निर्णयाविषयी. म्हणजे हरियाणा तसेच जम्मू-काश्मीर या राज्यांतील निवडणुकांविषयी. प्रथम हरियाणा. या राज्यात एकाच टप्प्यात १ ऑक्टोबरास निवडणुका होतील. सध्या त्या राज्यात प्रेमळ राज्यपालांच्या सौजन्याने भाजप सत्तेत आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकांत भाजपच्या या राज्यातील खासदारांची संख्या शंभर टक्क्यांवरून पन्नास टक्क्यांवर आली. म्हणजे १०चे पाच झाले. यापेक्षाही अधिक चिंतेची बाब म्हणजे मतांचे प्रमाण एकाच झटक्यात १२ टक्क्यांनी घटले. राज्याच्या एकूण ९० पैकी ४४ विधानसभा क्षेत्रांत भाजपस काहीसे मताधिक्य मिळाले. याउलट काँग्रेस ४२ तर ‘आम आदमी पक्ष’ चार क्षेत्रांत आघाडीवर राहिला. लोकसभेचे वेगळे, विधानसभेचे निराळे हे खरे असले तरी यातून राजकीय वाऱ्यांची दिशा लक्षात येते. या दिशेत दोन कारणांनी बदल होऊ शकतो. भाजप स्वबळावर किती आश्वासक चेहरा त्या राज्यास देऊ शकतो, हे एक. आणि काँग्रेस, ‘आप’ हे ‘इंडिया’ आघाडी घटक किती पोक्तपणा दाखवू शकतात. खेरीज काँग्रेसला आपले बुलंद हरयाणवी भूपिंदर-दीपिंदर हुडा हे पितापुत्र आणि कुमारी सेलजा यांच्यातील संघर्षासही विराम द्यावा लागेल. त्या राज्यात काँग्रेसला पराभूत करण्यासाठी काँग्रेस इतकी ताकद भाजपत नाही. वर ‘आप’ची स्वतंत्र लढण्याची भुणभुण हा धोका आहेच. या आव्हानांवर काँग्रेस कशी मात करते आणि दुसरीकडे भाजपचे अजूनही भिरभिरलेले मुख्यमंत्री नायब सिंग सैनी हे माजी मनोहरलाल खट्टर यांच्या सावलीतून बाहेर येऊन काही करू शकतात का आणि त्यासाठी नरेंद्र मोदी आदींच्या साह्याचा किती उपयोग होतो यावर हरियाणात काय होईल हे ठरेल. तथापि या निवडणुकीचे नायकत्व आहे ते जम्मू-काश्मिराकडे. तब्बल दहा वर्षांनी या राज्यातील मतदारांच्या तर्जनीस विधानसभा निवडणुकीची शाई लागेल. त्याआधी राष्ट्रप्रेमी भाजप आणि राष्ट्रद्रोही मेहबूबा मुफ्ती यांच्या ‘पीडीपी’ यांची सत्ता होती. ते सरकार भाजपच्या इच्छेनुसार गेले. पुढे २०१४ नंतर त्या राज्याने लोकनियुक्त सरकार पाहिलेले नाही. नंतर तर तीन वर्षांनी त्या राज्यास विशेष दर्जा देणारे ‘अनुच्छेद ३७०’ निष्प्रभ केले गेले आणि त्या राज्याची दोन शकलेच केली गेली. त्यानंतरच्या पाच वर्षात या राज्याने काय कमावले याचा वेध ‘लोकसत्ता’ने अलीकडेच (६ ऑगस्ट) ‘लालयेत पंचवर्षाणि’ या संपादकीयात घेतला. या दहा वर्षांत बरेच काही घडले. त्यात श्रीनगर हे ‘स्मार्ट’ बनणार होते ते राहिले ही अत्यंत गौण बाब. हा स्मार्टनेस येण्याआधीच त्या शहरास पुराने कसे विदीर्ण केले याच्या आठवणी अद्यापही ताज्या असतील. तेव्हा श्रीनगरचे स्मार्ट होणे राहिलेच. पण केंद्राने २०२२ साली राज्यातील मतदारसंघांची पुनर्रचना करून हिंदूबहुल जम्मू परिसरातून अधिक आमदार येतील आणि त्याचवेळी मुसलमानबहुल काश्मीर खोऱ्यातून इतकी वाढ होणार नाही, याची खात्री करून घेतली. त्यानुसार जम्मूतून या विधानसभेत पूर्वीच्या ३७ ऐवजी आता ४३ – म्हणजे सहा आमदार अधिक येतील तर काश्मिरातून एक. अशा तऱ्हेने यंदाच्या ९० आमदारांत जम्मूतील ४३ आणि काश्मिरातील ४७ असतील. ही मतदारसंघांची पुनर्रचना झाल्यानंतर काही महिन्यांत दुर्दैवाने दहशतवाद्यांनीही आपल्या ‘धोरणांची’ फेरआखणी केली. परिणामी जम्मूतील दहशतवाद वाढला आणि काश्मिरातील घटला. ही नवी डोकेदुखी. ती वाढत असतानाच लोकसभा निवडणुका झाल्या. तीत दहशतीत जगणाऱ्या जम्मू-काश्मिरातील नागरिकांनी सुखासीन दक्षिण मुंबईतील नागरिकांपेक्षा आपण अधिक लोकशाहीवादी आहोत हे दाखवून दिले. लोकसभा निवडणुकीत या राज्यात सरासरी ५८ टक्क्यांहून अधिक मतदान झाले. त्यात काश्मीर खोऱ्यातून ‘नॅशनल कॉन्फरन्स’चे दोन, जम्मूत भाजपचे दोन आणि बारामुल्लासारख्या तप्त मतदारसंघातून शेख रशीद अहमद ऊर्फ इंजिनीअर रशीद हा निवडून आला. तो ‘अवामी इत्तेहाद पार्टी’चा. त्याने एकाच वेळी पीपल्स कॉन्फरन्सच्या साजिद गनी लोन आणि नॅशनल कॉन्फरन्सचे माजी मुख्यमंत्री साक्षात फारुख-सुपुत्र ओमर अब्दुल्ला या दोन तगड्यांना हरवले. हा धक्का एवढाच नाही. हा इंजिनीअर रशीद दहशतवाद्यांस मदत केल्याच्या आरोपाखाली तुरुंगात आहे. त्याच्या प्रचाराची धुरा स्थानिक तरुणांनी उत्स्फूर्तपणे सांभाळत प्रस्थापितांना धूळ (की बर्फ?) चारण्यात यश मिळवले. इतकेच नाही. या निवडणुकीत एकेकाळच्या फुटीरतावादी पण भाजपच्या सहकार्याने राष्ट्रवादी झालेल्या माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांनाही मतदारांनी घरी पाठवले. अन्यत्र ज्याप्रमाणे पूर्वाश्रमीचे भ्रष्टाचारी भाजपच्या पुण्यस्पर्शाने पावन होतात तद्वत त्या राज्यात पूर्वाश्रमींच्या फुटीरतावाद्यांचे होते. तथापि समाधानाची बाब अशी की अन्य मतदारांप्रमाणे त्या राज्यांतील मतदारही अशा परिवर्तनास पराभूत करतात. हा प्रसंग नमूद केला कारण त्यावरून नागरिकांच्या मनांतील खदखद लक्षात यावी.

# नात्यात नफा आणि तोटा पाहिला जात नाही.

विनोद हायवेवर गाडी चालवत होता.त्याला रस्त्याच्या कडेला एक १२-१३ वर्षांची मुलगी टरबूज विकताना दिसली.विनोदने गाडी थांबवली आणि विचारले, बेटा,टरबूजाची किंमत काय आहे? मुलगी म्हणाली ५० रुपये किमतीचे टरबूज आहे सर. मागच्या सीटवर बसलेल्या विनोदची बायको म्हणाली एवढे महागडे टरबूज घेऊ नकोस.चल इथून. विनोद म्हणाला, कुठे महाग आहे.त्याच्याकडे असलेले एकही टरबूज पाच किलोपेक्षा कमी नसेल.जर तुम्ही एक ५० रुपयांना देत असेल, तर ते आम्हाला १० रुपये किलो लागेल. बाजारातून २० रुपये किलोनेही मिळते...ते तू विकत घेऊन येते. विनोदची बायको म्हणाली, तूम्ही थांबा,मला किंमत (सौदा) करू द्या...मग ती मुलीला म्हणाली तुम्हाला तीस रुपये द्यायचे असतील तर दे,नाहीतर राहू दे. मुलगी म्हणाली, आंटी,मी ४० रुपयांना टरबूज खरेदी केलेत.तुम्ही ४५ रुपयांना खरेदी करा.मी तुम्हाला यापेक्षा स्वस्त देऊ शकणार नाही... विनोदच्या पत्नीने म्हणाली.खोटं बोलू नकोस बेटा...योग्य दर सांग.बघ,हा तुझा धाकटा भाऊ आहे ना? या कारणासाठी ते थोडे स्वस्त कर. खिडकीतून डोकावणाऱ्या आपल्या चार वर्षांच्या मुलाकडे बोट दाखवत ती म्हणाली.सुंदर मुलाला पाहून,मुलगी तिच्या हातात एक टरबूज उचलून कारच्या जवळ आली. मग त्या मुलाच्या गालाला हात लावत म्हणाली.खरंच माझा भाऊ खूप देखणा आहे आंटी...विनोदची बायको मुलाला म्हणाली, बहिणीला नमस्कार कर बेटा...मुलाने प्रेमाने म्हटले, नमस्कार दीदी... मुलीने गाडीची खिडकी उघडली आणि मुलाला बाहेर काढले आणि मग म्हणालीतुझे नाव काय भाऊ? मुलगा म्हणाला, माझे नाव गोलू आहे, दीदी... आपल्या मुलाला बाहेर काढल्यामुळे विनोदची बायको थोडी अस्वस्थ झाली.ती लगेच म्हणाली, अरे बेटा,त्याला आत परत पाठव.त्याला धुळीची ॲलर्जी आहे...मुलगी त्याच्या आवाजाकडे दुर्लक्ष करून मुलाशी बोलली तू खरंच गुबगुबीत भाऊ आहेस.टरबूज खाशील का? मुलाने होकार दिल्यावर मुलीने त्याला टरबूज दिले.गोलूला पाच किलो टरबूज सांभाळता आले नाही. टरबूज निसटला आणि हातातून खाली पडला आणि त्याचे तीन-चार तुकडे झाले.टरबूज पडून तुटल्याने मुलगा रडू लागला.मुलगी त्याला सांभाळत म्हणाली.अरे भाऊ, रडू नकोस.मी अजून एक घेऊन येते.मग तिने धावत जाऊन दुसरे मोठे टरबूज उचलले. तिने टरबूज उचलले तोपर्यंत विनोदच्या पत्नीने मुलाला गाडीच्या आत ओढले आणि खिडकी बंद केली.मुलीने उघड्या ग्लासमधून टरबूज आत दिले आणि म्हणाली, हे घे भाऊ,खूप गोड निघेल. विनोद शांत बसून त्या मुलीची कृती पाहत होता.विनोदची पत्नी म्हणाली जे टरबूज फुटले त्याचे पैसे मी देणार नाही.तुझ्या चुकीमुळे फुटले...मुलगी हसत म्हणाली, सोडा काकू.या टरबूजचे पैसेही देऊ नका.मी माझ्या भावासाठी दिले आहे... हे ऐकून विनोद आणि त्याची पत्नी दोघेही हतबल झाले.विनोद म्हणाला, नाही मुलगी,तुझ्या दोन्ही टरबुजाचे पैसे घे...मग त्याने १०० रुपयांची नोट त्या मुलीकडे दिली.मुलीने हाताच्या इशाऱ्याने नकार दिला आणि तिथून निघून गेली.आणि तिच्या उरलेल्या टरबुजाजवळ जाऊन उभी राहिली.गाडीतून उतरल्यावर विनोदही तिथे आला होता. येताच तो म्हणाला पैसे घे बेटा नाहीतर तुझे मोठे नुकसान होईल... मुलगी म्हणाली आई म्हणते नात्याचा विचार केला तर नफा-तोट्यात फरक नसतो.तू गोलूला माझा भाऊ म्हटल्यावर मला खूप बरं वाटलं.माझाही एक लहान भाऊ होता पण..विनोद म्हणाला, काय झालं तुझ्या भावाला?ती म्हणाली...जेव्हा तो दोन वर्षांचा होता,त्याला रात्री ताप आला होता.माझी आई त्याला सकाळी दवाखान्यात नेण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.मला माझ्या भावाची खूप आठवण येते.त्याच्या एक वर्ष आधी वडिलांचेही असेच आम्हाला सोडून निधन झाले होते...विनोदची पत्नी म्हणाली.घे मुली घे, तुझे पैसे घे...मुलगी म्हणाली, मी पैसे घेणार नाही काकू...विनोदची बायको गाडीपाशी गेली आणि मग तिच्या पिशवीतून पायलची जोडी काढली.जी तिने आज तिच्या आठ वर्षांच्या मुलीसाठी तीन हजार रुपयांना विकत घेतली होती.मुलीला देताना ती म्हणाली.तुम्ही गोलूला तुमचा भाऊ मानलात, तर मी तुझ्या आई सारखे झाले.आता तु हे घेण्यास नकार देऊ शकत नाही...मुलीने हात पुढे केला नाही तेव्हा त्याने बळजबरीने मुलीच्या मांडीवर पायल घातला आणि म्हणाली.हे ठेव...जेव्हाही घालशील तेव्हा आम्हा सगळ्यांची आठवण येईल... असं म्हणत ती परत निघून गाडीत बसली.मग विनोदने गाडी सुरू केली आणि मुलीला बाय म्हणत ते निघून गेले.विनोद गाडी चालवताना विचार करत होता की भावनिकता म्हणजे काय... काही वेळापूर्वी त्याची बायको रु.१०-२० वाचवण्यासाठी युक्त्या अवलंबत होती.थोड्याच वेळात ती इतकी बदलली की तिने रु.३००० किमतीची पायल दिली.तेव्हा अचानक विनोदला त्या मुलीची एक गोष्ट आठवली. नात्यात नफा आणि तोटा पाहिला जात नाही.विनोद हा त्याच्याच मोठ्या भावाविरुद्ध मालमत्तेच्या वादातून न्यायालयात खटला चालवत होता.त्याने लगेच मोठ्या भावाला फोन केला.फोन उचलताच तो म्हणाला, भाऊ, मी विनोद...भाऊ म्हणाला, का फोन केलास?विनोद म्हणाला भाऊ, तुम्ही ते मुख्य बाजाराचे दुकान घ्या.माझ्यासाठी ते मार्केटमध्ये सोडा.आणि तुम्ही तो मोठा प्लॉट पण घ्या.मी लहान घेईन.मी उद्याच केस मागे घेत आहे... बराच वेळ समोरून आवाज आला नाही.तेव्हा त्याचा मोठा भाऊ म्हणाला, यामुळे तुझे खूप नुकसान होईल, विनोद...विनोद म्हणाला.भाऊ, आज मला समजले की नात्यात नफा-तोटा नसतो एकमेकांचा आनंद बघता येतो...तेथून पुन्हा एकदा शांतता पसरली होती.तेवढ्यात विनोदला त्याच्या मोठ्या भावाचा रडण्याचा आवाज ऐकू आला. विनोद म्हणाला रडतोस का भाऊ? मोठा भाऊ म्हणाला, तुम्ही आधी इतके प्रेमाने बोलला असता तर मी तुला सर्व काही दिले असते. आता घरी चल...तुम्ही दोघेही प्रेमाने एकत्र बसून वाटून घेऊ... काही गोड शब्द उच्चारताच इतका कडवटपणा कुठे गेला कळलेच नाही...जे काल एक-एक इंच जमिनीसाठी लढत होते, ते आज आपल्या भावाला सर्वस्व द्यायला तयार आहेत यातुन बोध घेण्या सारखा आहे.त्यागाची भावना ठेवा.द्यायला सदैव तयार असाल तर घेणाऱ्याचे हृदयही बदलेल.लक्षात ठेवा नात्यात नफा तोटा बघितला जात नाही.कधी कधी आपल्या प्रियजनांना जवळ ठेवण्यासाठी आपला हक्क सोडावा लागतो.अनेक लोक आहेत स्वताचे दुख व्यक्त करण्यासाठी सोशल मिडियचा वापर करतात.आपले नांव गांव कोणाला कळणार नाही याची दक्षता घेतात.आवर्जून माझे वाटसप्प नंबर वर पाठवतात.मला खूप आवडली आपणे याला प्रसिद्ध करा अशी विनंती करतात.मला ही वाटते हे अनेक कुटुंबातील नात्यातील नफा तोटा पाहण्याची परिस्थिती आहे. हे सत्य नाकारता येत नाही.



*********

सागर रामभाऊ तायडे
-९९२०४०३८५९,भांडुप.

# सध्याच्या मुलांमध्ये जाणवतो सहनशक्तीचा अभाव

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात,जीवनाची गती झपाट्याने वाढली आहे. डिजिटल युगात मुलांना भरपूर संधी आणि सुविधा मिळत असल्या तरीही, त्यांची मानसिक आणि भावनिक विकासात काही अडचणी निर्माण होत आहेत.या वातावरणात,सध्याच्या मुलांमध्ये सहनशीलतेचा अभाव जाणवतो.मुलांची सहनशीलता कमी होण्याची कारणे, त्याचे परिणाम,आणि त्यावर उपाय याबद्दल चर्चा करणे आवश्यक आहे.आजच्या काळात मुलांना तत्काळ समाधानाची सवय लागली आहे.स्मार्टफोन,इंटरनेट,आणि तत्काळ मिळणाऱ्या माहितीमुळे त्यांची धैर्य आणि सहनशीलता कमी होत आहे.त्यांना कोणत्याही गोष्टीची प्रतीक्षा करण्याची किंवा त्यासाठी मेहनत घेण्याची सवय राहत नाही.लहानसहान अडचणींना तोंड देताना किंवा संकटांचा सामना करताना त्यांची सहनशीलता कमी होते.

कारणे
तंत्रज्ञानाचा अतिरेक : सतत इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर,गेम्स,आणि तत्काळ उत्तर मिळवण्याची सवय मुलांमध्ये सहनशीलतेचा अभाव निर्माण करते.
अधिक आरामदायक जीवनशैली: आजच्या पालकांनी आपल्या मुलांना सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे मुलांना काही गोष्टींसाठी संघर्ष करावा लागत नाही.
वाढत्या शैक्षणिक आणि सामाजिक स्पर्धा:शैक्षणिक आणि सामाजिक स्पर्धेमुळे मुलांच्या मानसिक ताणात वाढ होते, ज्यामुळे त्यांची सहनशीलता कमी होते.
पालकांची व्यस्त जीवनशैली-व्यस्त जीवनशैलीमुळे पालक मुलांसोबत पुरेसा वेळ घालवू शकत नाहीत, ज्यामुळे मुलांना मार्गदर्शनाची कमतरता भासते.

परिणाम
सहनशीलतेचा अभाव असलेल्या मुलांना त्यांच्या वैयक्तिक,शैक्षणिक,आणि सामाजिक जीवनात विविध समस्यांचा सामना करावा लागतो.
मानसिक ताण आणि तणाव : लहानसहान समस्यांनाही ताणतणाव निर्माण होतो, ज्यामुळे मानसिक आरोग्य धोक्यात येते.
स्वावलंबनाचा अभाव: सहनशीलतेच्या अभावामुळे मुलांना स्वावलंबी होण्याची क्षमता कमी होते.
नकारात्मकता: निराशा, क्रोध,आणि असमाधान यांचा प्रभाव वाढतो,ज्यामुळे सकारात्मक दृष्टिकोनाचा अभाव जाणवतो.
सामाजिक कौशल्यांचा अभाव: मुलांना सामाजिक कौशल्ये आणि संघर्ष व्यवस्थापनाची कला शिकण्याची संधी कमी मिळते.

शिक्षणावर दुष्परिणाम
सहनशीलतेचा अभाव मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी हानिकारक ठरू शकतो.तसेच मुलांच्या शैक्षणिक जीवनावर अनेक दुष्परिणाम घडवतो. काही महत्त्वाचे दुष्परिणाम खाली नमूद केले आहेत.
शैक्षणिक प्रगतीत कमतरता सहनशीलतेच्या अभावामुळे मुलांची एकाग्रता कमी होते, आणि ते शैक्षणिक कार्यात अपेक्षित कामगिरी करू शकत नाहीत.परीक्षेच्या तणावामुळे त्यांना अभ्यासावर लक्ष केंद्रित करता येत नाही, त्यामुळे त्यांचे गुण कमी होतात.
सोशियल फोबिया आणि आत्मविश्वासाचा अभाव शाळेतील तणावग्रस्त वातावरणात सहनशीलतेचा अभाव असलेल्या मुलांना इतरांसमोर आपले विचार मांडणे कठीण जाते. अशा मुलांना वर्गात प्रश्न विचारण्यास भीती वाटते त्यामुळे त्यांच्या शंकांचे निरसन होत नाही,ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होतो आणि शैक्षणिक प्रगतीला अडथळा निर्माण होतो.
अनुत्तीर्ण होण्याची शक्यता सहनशीलतेच्या अभावामुळे मुलांना शैक्षणिक तणावाचा सामना करण्याची क्षमता कमी होते,आणि सततच्या तणावामुळे त्यांना अनुत्तीर्ण व्हावे लागते, ज्यामुळे त्यांच्या शैक्षणिक जीवनात मोठे आव्हान निर्माण होते.

उपाय
सध्याच्या मुलांमध्ये सहनशीलता वाढवण्यासाठी काही उपाय करणे आवश्यक आहे.
तंत्रज्ञानाचा मर्यादित वापर : मुलांना तंत्रज्ञानाचा संतुलित वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे.
समय व्यवस्थापन : मुलांना वेळेचे महत्त्व समजावून देणे आणि त्यांच्या दिनक्रमात शिस्त आणणे.
धैर्य आणि संयमाचे धडे : विविध शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांमध्ये मुलांना सहभागी करून घेणे.
सकारात्मक दृष्टिकोन: पालकांनी आणि शिक्षकांनी मुलांना सकारात्मक दृष्टिकोन आणि मानसिक स्थिरता यांचे धडे देणे.

सध्याच्या काळात मुलांमध्ये सहनशीलतेचा अभाव जाणवणे हा एक गंभीर प्रश्न आहे. या समस्येचे निराकरण करण्यासाठी पालक,शिक्षक,आणि समाज यांचे सहकार्य आवश्यक आहे.मुलांना धैर्य,संयम,आणि सहनशीलता यांचे महत्त्व समजावून देणे आवश्यक आहे.त्यांना सकारात्मक दृष्टिकोन आणि मानसिक स्थिरता वाढवण्यासाठी प्रोत्साहित करणे हे आपले कर्तव्य आहे.शिक्षणाच्या माध्यमातून सहनशीलता वाढवण्यासाठी विविध अध्यापन पद्धतींचा वापर करणे आवश्यक आहे,जसे की समस्या-आधारित शिक्षण,शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे शिक्षण,सर्जनशीलता आणि कला शिक्षण.मुलांना धैर्य,संयम,आणि सहनशीलता यांचे महत्त्व शिकवून त्यांना शैक्षणिक तणावाचा सामना करण्यासाठी सक्षम बनवणे आवश्यक आहे. शिक्षक,पालक,आणि समाज यांनी एकत्र येऊन मुलांच्या सहनशीलतेच्या विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत.शाळेत आणि घरात सकारात्मक वातावरण निर्माण करून,मुलांना त्यांच्या तणावग्रस्त परिस्थितींचा सामना करण्यासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. यामुळे मुलांची शैक्षणिक कामगिरी सुधारेल व त्यांचा आत्मविश्वास वाढेल,आणि त्यांना भविष्यातील आव्हानांचा सामना धैर्याने आणि संयमाने करता येईल.

भविष्याचा विचार
मुलांच्या सहनशीलतेचा विकास हा त्यांच्या शैक्षणिक,सामाजिक,आणि भावनिक यशासाठी एक महत्त्वपूर्ण घटक आहे. सहनशीलता वाढवण्याच्या उपाययोजना आणि कार्यक्रमांची अंमलबजावणी केल्यास मुलांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारेल, आणि ते मानसिक आरोग्यदृष्ट्या अधिक सक्षम बनतील. त्यामुळे, सहनशीलतेचा अभाव दूर करून एक समर्थ आणि धैर्यशील पिढी घडवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.



*******************

डॉ.आशा अशोक ब्राह्मणे ८१०८८२०४५४
आदर्श शिक्षिका(बी एम सी)
मढ मराठी मुंबई पब्लिक स्कूल मालाड(प) मुंबई

# मला उमगलेले माझे दादा!

भारतात चित्रपटांचा पाया घातला गेला तो ऐतिहासिक आणि पौराणिक चित्रपटांनी. लोकांना माहीत असलेल्या कथानकांवरील हे चित्रपट भरपूर गर्दी खेचत. साहजिकच त्याच प्रकारचे चित्रपट काढण्याकडे त्यावेळच्या चित्रपटकर्मींचा प्रयत्न असायचा हे स्वाभाविकच होतं. व्ही. शांताराम, भालजी पेंढारकर यांनीही सुरुवातीला तोच मार्ग चोखाळला यात नवल नाही. व्ही. शांताराम यांनी १९३२ साली ‘अयोध्येचा राजा’ हा चित्रपट काढायचं ठरवलं तेव्हा त्यांना आपले मावसभाऊ मा. विनायक यांची आठवण झाली. तेव्हा मा. विनायक शिक्षकी पेशात होते. ते इंग्रजी आणि मराठी हे विषय शिकवीत. कुठलाही विषय तळमळीने शिकवायची त्यांची हातोटी होती. ते कविताही गाऊन शिकवत. त्यांचा गळा गोड होता. ते दिसायलाही देखणे होते. साहजिकच ‘अयोध्येचा राजा’च्या वेळी व्ही. शांताराम यांना ते आठवले. त्यांनी त्यांना चित्रपटात येण्याविषयी विचारलं. आणि मा. विनायक या चित्रपटातून चित्रसृष्टीत पदार्पण करते झाले. बोलका चेहरा, मधुर आ-वाज, देखणं रूप यामुळे त्यांना नारदाची भूमिका त्यात दिली गेली. हा चित्रपट सुपरहिट् ठरला. त्यांचा पुढचा चित्रपट ‘अग्निकंकण. त्यात त्यांना प्रमुख हिरोची भूमिका मिळाली. हाही चित्रपट भरपूर चालला आणि त्यांच्याकडे चित्रपटांची रांगच लागली. तोवर ते व्ही. शांताराम यांच्याकडे प्रमुख साहाय्यक दिग्दर्शक म्हणूनही धडे घेऊ लागले होते. त्यानंतर ‘माया मच्छिंद्र’, ‘सिंहगड’, ‘आकाशवाणी’, ‘भिकारन’ अशा चित्रपटांची रीघ त्यांच्याकडे लागली.

आणि एक शाळामास्तर चित्रपटांत स्थिरावू लागला. त्यांचं वाचन भरपूर होतं. मोठमोठे साहित्यिक त्यांनी वाचले होते. तोवर नाटक-चित्रपटांतून भडक अभिनयाची पद्धत रूढ होती. ती मा. विनायक यांना काही मान्य नव्हती. चित्रपटाचा कॅमेरा अत्यंत सूक्ष्म हालचाली, हावभाव टिपत असताना असं करणं त्यांना पटत नव्हतं. शिवाय त्याच त्या ऐतिहासिक-पौराणिक कथाविषयांतून चित्रपटांना बाहेर काढायला हवं असंही त्यांना वाटू लागलं होतं. त्यावेळच्या कलाकारांच्या भडक अभिनयाला छेद देत मा. विनायक नैसर्गिक अभिनय करत. आणि लोकांनाही तो आवडत असे. एक नैसर्गिक अभिनय करणारा कलाकार म्हणून त्यांची ओळख हळूहळू प्रेक्षकांना होत होती. १९३५ साली त्यांनी ‘विलासी ईश्वर’ हा चित्रपट प्रथमच हिंदी-मराठीत दिग्दर्शित केला. त्यात तनुजा आणि नूतन यांच्या आई शोभना समर्थ या हिरॉइन होत्या. त्या या चित्रपटाआधीच खरं तर लोकप्रिय झालेल्या होत्या. मा. विनायकांनी या चित्रपटात दिग्दर्शनासह अभिनेते म्हणूनही काम केलं. हा चित्रपट तुफान चालला. त्यानंतरचा त्यांचा चित्रपट होता- ‘छाया.’ मराठी आणि हिंदीतही त्यांनी तो केला. त्यात प्रमुख नायिकेच्या भूमिकेत होत्या लीला चिटणीस आणि सुमती गुप्ते. मा. विनायक यात प्रमुख भूमिका आणि दिग्दर्शनही करत होते.

चित्रपटांचा प्रचलित साचा मोडायचं त्यांनी ठरवलं आणि वि. स. खांडेकर, आचार्य अत्रे यांच्यासारख्या दिग्गज साहित्यिकांकडून त्यांनी चित्रपट लिहून घेतले. कुमारी मातासारखा विषय घेऊन त्यांनी चित्रपट करायचं ठरवलं तेव्हा व्ही. शांताराम यांनी त्यांना सावध करायचा प्रयत्न केला. असे विषय लोकांना रुचणार नाहीत असं ते म्हणाले. पण मा. विनायक आपल्या म्हणण्यावर ठाम होते. सामाजिक विषय हाताळून ते यशस्वी करून दाखवायचा त्यांनी जणू विडाच उचलला होता. ‘माझं बाळ’ या चित्रपटाने त्यांनी आपण काळाच्या पुढचा विचार करणारे चित्रपटकार आहोत हे लोकांच्या मनावर ठसठशीतपणे बिंबवलं ज्यावर पुढच्या काळात ‘धूल का फूल’ हा सिनेमा निघाला.

१९३८ साली त्यांनी ‘ब्रह्मचारी’ या चित्रपटाची निर्मिती केली. मोठ्या पडद्यावर विडंबनात्मक चित्रपटांचा एक नमुना त्यांनी याद्वारे पेश केला. शालूतून जोडे मारण्यासारखा हा प्रकार होता. चित्रपटाचा विषय वरकरणी उथळ वाटला तरी त्यात पाचकळ विनोद, अश्लील हावभाव, अंगविक्षेप असले प्रकार नव्हते. नायिका मीनाक्षी यांचा पाण्यात पोहण्याचा सीनही व्हल्गर होणार नाही याची खबरदारी त्यांनी घेतली होती. हा चित्रपट खूप गाजला, परंतु त्यांच्यावर अश्लीलतेचा आक्षेप कुणी घेतला नाही. कारण तशाच पद्धतीनं तो चित्रित केलेला होता. १९३८ सालीच त्यांचा ‘ज्वाला’ हा दुसरा बिग बजेट चित्रपट आला. प्रचलित साचे मोडायचा त्यांनी जणू चंगच बांधला होता. मोठमोठे सेट्स वगैरेचा वापर त्यात होता.

‘लग्न पाहावं करून’पासून त्यांनी आपली ‘प्रफुल्ल पिक्चर्स’ ही कंपनी सुरू केली. त्याद्वारे ‘देवता’, ‘ब्रॅण्डीची बाटली’ (‘ब्रँडी की बोतल’), ‘अर्धांगिनी’ (‘घर की रानी’), ‘अमृत’, ‘सरकारी पाहुणे’, ‘सुभद्रा’ अशा अनेक चित्रपटांची निर्मिती त्यांनी केली. ‘जीवनयात्रा’सारखा बसप्रवासावर आधारित चित्रपट त्यांनी त्याकाळी काढला. चित्रपटाला नेहमीपेक्षा हटके, वेगळी ट्रीटमेंट देण्याचे त्यांचे नेहमीच प्रयत्न राहिले. त्यावेळी राम गबाळे, दिनकर द. पाटील यांच्यासारखे पुढे दिग्दर्शक म्हणून नावाजलेले चित्रकर्मी त्यांचे असिस्टंट म्हणून काम करीत होते.

त्यांच्या ‘बडी मां’ या चित्रपटात त्याकाळची ख्यातनाम गायिका-अभिनेत्री नूरजहाँ ही हिरोईन होती. ‘एका मोठ्या दिग्दर्शकाबरोबर काम करण्याचं सौभाग्य मला या चित्रपटाने मिळालं,’ असे उद्गार त्यांनी तेव्हा काढले होते.

आधी नंतर आणि पुढे मुंबईत मा. विनायक यांनी स्थलांतर केलं तरी त्यांनी आपल्याबरोबर आपले सहकारी कलावंत, तंत्रज्ञही सोबत आणलं. नुसतं सोबत आणलं नाही, तर त्यांची इथे राहण्या-प्रवासाचीदेखील सोय त्यांनी केली. ते प्रचंड देशप्रेमी होते. अनेक भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांना ते आपल्या घरी आसरा देत. त्यांची ऊठबस करत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले तेव्हा त्यांनी बंगल्यात ध्वजवंदन करून आपल्या मुलांना भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची माहिती दिली होती.

मा. दीनानाथांचे ते प्रचंड चाहते होते. त्यामुळे त्यांच्या अकाली निधनानंतर त्यांनी त्यांच्या मुलांना आपल्या घरी आणलं. त्यांची मोठी मुलगी लता मंगेशकर यांना त्यांनी आपल्या चित्रपटांतून आवर्जून भूमिका देऊन आणि गाण्याची संधी देऊन त्यांनी आयुष्यात उभं केलं. मंगेशकर भावंडांनीही त्यांच्या या ऋणाची कायम जाण ठेवली. १९४७ मध्ये त्यांनी ‘मंदिर’ या चित्रपटाचा घाट घातला.

# मोटरसायकल चोरीचे २ गुन्हे उघड. ३ आरोपींना अटक.उपविभागीय पोलीस अधिकारी,लातूर शहर यांच्या विशेष पथकाची कारवाई




लातूर :– २ लाख ५ हजार रुपये किमतीच्या ३ मोटरसायकल जप्त. ३ आरोपींना अटक. मोटरसायकल चोरीचे २ गुन्हे उघड. उपविभागीय पोलीस अधिकारी,लातूर शहर यांच्या विशेष पथकाची कारवाई* या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात जिल्ह्यातील पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता अधिकाऱ्यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते. पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय (लातूर शहर) चे उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय (लातूर शहर) चे विशेष पोलीस पथक मोटरसायकल चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीच्या माहितीचे संकलन करीत असताना, दिनांक १७/०८/२०२४ रोजी सदर पथकाला माहिती मिळाली की, मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी त्यांने चोरलेली मोटरसायकल घेऊन आदर्श कॉलनी परिसरात फिरत आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर पथक तात्काळ आदर्श कॉलनी परिसरात पोहचून रोडवर मोटार सायकलसह थांबलेल्या इसमाला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांने त्याचे नाव अमीर शहाबुद्दीन शेख वय ३१ वर्ष राहणार बुधोडा, तालुका औसा जिल्हा लातूर असे असल्याचे सांगितले. तसेच त्यांच्या ताब्यात असलेल्या वाहनासंदर्भाने विचारपूस केली असता सांगितले कि, सदरची मोटर सायकल काही महिन्यापूर्वी मध्यवर्ती बस स्थानक, लातूर समोरून चोरी केली आहे. तसेच काही महिन्यापूर्वी लातूर शहरातील विविध ठिकाणाहून आणखीन २ मोटारसायकली त्याचे आणखीन साथीदार नाव उमर मोहम्मद शेख, वय ३३ वर्ष, राहणार बुधोडा तालुका औसा, गौतम न्यानोबा कांबळे, वय ४५ वर्ष,राहणार बुधोडा तालुका औसा. अशांनी मिळून चोरी केल्याचे सांगितले.

त्यावरून नमूद तिन्ही आरोपींना त्यांनी विविध ठिकाणाहून चोरी करून लपवून ठेवलेल्या आणखीन दोन चोरीच्या मोटारसायकली अशा एकूण तीन मोटारसायकली ज्याची एकूण किंमत ०२ लाख ०५ हजार रुपयाचा मुद्देमाल सह त्यांच्या राहत्या ठिकाणाहून ताब्यात घेण्यात आले असून पुढील कार्यवाही करिता पोलीस ठाणे गांधी चौक यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पोलीस ठाणे गांधी चौक चे पोलीस अमलदार नराळे पुढील तपास करीत आहेत.

सदरची कारवाई वरिष्ठांचे व मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय (लातूर शहर) च्या विशेष पथकातील पोलीस उप–निरीक्षक रामचंद्र ढगे, पोलीस अंमलदार महेश पारडे, अभिमन्यू सोनटक्के व पोलीस ठाणे विवेकानंद चौक चे पोलीस अंमलदार विनोद चलवाड यांनी केली आहे.

# लॅटरल एंट्री काँग्रेसची संकल्पना, केंद्र सरकारचा पलटवार





नवी दिल्ली, : केंद्रीय लोकसेवा आयोगात (युपीएससी) समस्तर प्रवेशावरुन (लॅटरल एंट्री) काँग्रेसने केलेल्या आरोपांमुळे राजकारण तापले आहे. काँग्रेसच्या आरोपांना केंद्र सरकारने जोरदार प्रत्युत्तर दिले. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लॅटरल एंट्री ही काँग्रेसची संकल्पना असल्याचा पलटवार केला. फक्त त्याची अंमलबजावणी करण्याचे काम केंद्र सरकारने केले आहे, असे ते म्हणाले.

केंद्रीय मंत्री म्हणाले की, यूपीए सरकारच्या काळात लॅटरल एंट्रीची तरतूद करण्यात आली होती. ही यूपीए सरकारची विचारसरणी होती. ते म्हणाले की यूपीए सरकारच्या काळात २००५ मध्ये दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग (एआरसी) आणण्यात आला होता. या आयोगाचे अध्यक्ष वीरप्पा मोईली होते. एआरसीला असे आढळून आले की, काही सरकारी पदांसाठी विशेष ज्ञान आवश्यक असते जे नेहमी पारंपारिक नागरी सेवांमध्ये उपलब्ध नसते. या रिक्त जागा भरण्यासाठी खाजगी क्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधून व्यावसायिकांची नियुक्ती करण्याची शिफारस केली होती. यामुळे अर्थशास्त्र, वित्त, तंत्रज्ञान आणि सार्वजनिक क्षेत्र यासारख्या क्षेत्रात नवीन दृष्टीकोन आणि अत्याधुनिक कौशल्य प्राप्त होऊ शकते. नागरी सेवेची अखंडता आणि मूल्ये जपत त्यांच्या विशेष कौशल्याचा लाभ घेताना लॅटरल एंट्री करणाऱ्यांना विद्यमान नागरी सेवांमध्ये एकत्रित केले जावे यावर एआरसीने भर दिला होता. यूपीए सरकारच्या काळात झालेल्या अशा नियुक्त्यांचीही सरकारने अनौपचारिक माहिती दिली. यामध्ये सॅम पित्रोदा, व्ही कृष्णमूर्ती, विमल जालान, कौशिक बसू, एन. के. सिंह, अरविंद बिरमानी, रघुराम राजन, नंदन नीलेकणी अशा अनेक नियुक्त्या करण्यात आल्याचे केंद्र सरकारकडून सांगण्यात आले. मात्र, या नियुक्त्यांसाठी कोणतीही पारदर्शक पद्धत अवलंबण्यात आली नाही. केंद्रीय मंत्री म्हणाले की, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार स्थापन झाले तेव्हा एआरसीच्या शिफारशी लागू करण्यासाठी पारदर्शक पद्धतीचा अवलंब करण्यात आला. यामध्ये युपीएससीमार्फत लॅटरल एंट्रीची तरतूद करण्यात आली.

# काँग्रेस नेत्याचा जागीच मृत्यू

बंगळूरू : मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याशी संबधित एका पत्रकार परिषदेत बोलत असताना एका काँग्रेस नेत्याचा मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. पत्रकार परिषदेत बोलत असतानाच अचानक काँग्रेस नेत्याला हृदयविकाराचा झटका आला आणि त्याचा मृत्यू झाला. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी या दु:खद घटनेची माहिती दिली.







कर्नाटक राज्य मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक संघटनेचे सदस्य सीके रविचंद्रन यांचे सोमवारी पत्रकार परिषदेदरम्यान निधन झाले. राज्यपालांनी केलेल्या कारवाईच्या विरोधात पत्रकार परिषदेत ते बोलत होते. कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यावर खटला चालवण्यास परवानगी दिल्याच्या निषेधार्थ बेंगळुरू प्रेस क्लब येथे पत्रकार परिषदेत आयोजित करण्यात आली होती. मात्र पत्रकारांशी बोलत असतानाच सीके रविचंद्रन यांना हृदयविकाराचा झटका आला आणि ते कोसळले. त्यानंतर त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती देण्यात आली.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही या घटनेबाबत एक्स पोस्टवरुन दु:ख व्यक्त केले. कर्नाटक राज्य मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक संघटनेच्या वतीने राज्यपालांच्या खटल्याच्या आदेशाविरोधात बंगळुरू प्रेस क्लबमध्ये पत्रकार परिषद घेत असताना संघटनेचे सदस्य आणि आमच्या पक्षाचे कार्यकर्ता सीके रविचंद्रन यांचा मृत्यू झाला. त्यांना हृदयविकाराचा झटका आला आहे. संविधान आणि लोकशाही वाचवण्याच्या या लढ्यात आमचे साथीदार असलेले रविचंद्रन यांच्या अकाली निधनाने खूप दु:ख झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो अशी प्रार्थना करतो. त्यांच्या दु:खाच्या वेळी मी त्यांचे कुटुंबीयांसोबत आहे, असे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी म्हटले आहे.

# मुकुंदराव आंबेडकर रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने पुस्तकांचे वाटप







मुंबई :– विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोकणातील कोकणस्थ बांधवांच्या शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी बौद्धजन पंचायत समितीची स्थापना केली, बाबासाहेबांच्या शिका आणि संघटीत व्हा या मूलमंत्राच्या आधारावर शिक्षण हा समितीचा मुख्य उद्देश होता त्याच अनुषंगाने बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने मुकुंदराव आंबेडकर रात्रशाळा कुलाबा, मुंबई – १ चालविण्यात येत आहे, सदर शाळेतील ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना बुधवार दि. १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७:०० वाजता बौद्धजन पंचायत समिती संलग्न संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत यांच्या अध्यक्षतेखाली पुस्तक वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी सरचिटणीस राजेश घाडगे यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक सादर करताना कार्यक्रमाची रूपरेषा, उद्दिष्ट व स्वरूप याची माहिती दिली व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ही केले. कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना इसवी सन १९४१ साली बाबासाहेबांनी शैक्षणिक धोरण डोळ्यासमोर ठेऊन कश्याप्रकारे समितीची स्थापना केली याचा आढावा घेत समितीद्वारे शैक्षणिक कार्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची व मुकुंदराव आंबेडकर रात्रशाळेची माहिती देत, कामधंदा सांभाळून या रात्रशाळेतून अनेक विद्यार्थी घडले, मोठे झाले, उच्चशिक्षित होऊन मोठ्या पदावर गेले याची माहिती दिली. सदर प्रसंगी कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, सरचिटणीस राजेश घाडगे, चिटणीस विठ्ठल जाधव, आर्थिक समिती अध्यक्ष अरुण मोरे, शिक्षण समिती अध्यक्ष राजेंद्र पवार, चिटणीस मोहिते, रात्रशाळेचे प्रिन्सिपल व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते, या सर्वांनी देखील विद्यार्थ्यांना मौलिक असे मार्गदर्शन देत पुस्तक वाटप करून उज्वल भविष्याच्या शुभकामना दिल्या. सरतेशेवटी सरचिटणीस राजेश घाडगे यांनी यंदा मुकुंदराव आंबेडकर शाळेचा १००% रिझल्ट लागल्याने रात्रशाळेचे प्रिन्सिपल, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांचे कौतुक करीत सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मदत व परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## टिफिनमध्ये मांसाहारी पदार्थ घेऊन जाणं आरोग्यासाठी योग्य की अयोग्य? जाणून घ्या तज्ज्ञ काय सांगतात

लंच ब्रेकमुळे कामाचा ताण, डेडलाइन आणि जबाबदाऱ्यांपासून काही क्षण का होईना आराम मिळतो. तसेच लंच ब्रेकमध्ये खाल्ले जाणारे पदार्थ आरोग्यासाठी पौष्टिक असणेदेखील गरजेचे असतात. नुकत्याच नोएडामधील एका शाळेने पालकांना अन्न सुरक्षेच्या कारणास्तव मुलांच्या टिफिनमध्ये फक्त शाकाहारी अन्न पदार्थ पाठवण्याचे आवाहन केले आहे, त्यामुळे आता मांसाहारी पदार्थ खराब होण्याआधी टिफिनध्ये किती काळ सुरक्षितपणे साठवले जाऊ शकतात, असा प्रश्न निर्माण होत आहे. या संदर्भात इंडियन एक्स्प्रेसने आरोग्यतज्ज्ञांचा सल्ला घेतला आहे.दुपारच्या डब्यामध्ये मांसाहारी पदार्थ पॅक करताना सर्वात महत्त्वाच्या घटकांपैकी एक गोष्ट म्हणजे, डेंजर झोन तापमान हे आहे. ५ अंश सेल्सिअस आणि ६० अंश सेल्सिअस यांच्यातील तापमानामुळे अन्नजन्य आजारांना कारणीभूत असलेले जीवाणू वेगाने वाढू शकतात, फक्त २० मिनिटांत त्यांची संख्या दुप्पट होऊ शकते, असे डीटी. उमंग मल्होत्रा, क्लिनिकल आहारतज्ज्ञ, फिटेरो यांनी सांगितले.मल्होत्रा यांनी सांगितले की, मांसाहारी पदार्थ, मटण, चिकन आणि सीफूडमध्ये पोषक आणि आर्द्रता असते, जी जीवाणूंच्या वाढीसाठी आवश्यक आहे. ज्यामुळे साल्मोनेला, ई. कोलाय, कॅम्पिलोबॅक्टर आणि लिस्टेरिया मोनोसाइटोजेन्सची वाढ सहज होते.त्यांनी पुढे सांगितले की, जेव्हा मांसाहारी पदार्थ टिफीनमध्ये पॅक केले जातात आणि बरेच तास ते तुमच्या बॅगेमध्ये नॉर्मल टेंपरेचरवर असतात. हे विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये घातक ठरू शकतात.

# सावत्र आई जिजाबाईने बाबासाहेबांसाठी रमाई ही वधू म्हणून निश्चित केली - नारायण जाधव





मुंबई :– बाबासाहेबांच्या आई भीमाबाई रामजी सकपाळ यांच भिवा (बाबासाहेबांचे लहानपणीचे नाव) लहान असतानाच निधन झाले, त्यातच भिवाची आत्या मिराताई सकपाळ या दिव्यांग असल्याने त्यांना ही फारसे काम झेपत नसे त्यामुळे सुभेदार रामजी बाबा यांचा परिवार अक्षरशः उघड्यावर पडला, नोकरी सांभाळत घरची कामे यामुळे सुभेदार रामजी बाबा यांना मोठी तारेवरची कसरत करावी लागत असे, त्यातच बाल भिवा हा खोडकर असल्याने त्याच्या ही अनेक तक्रारी घरी येत असत, चारी मुलींची लग्न होऊन त्या सासरी गेल्या होत्या, मोठा मूलगा बाळाराम हा घर सोडून गेला होता त्यामुळे एका मित्राने सुचविले की रामजी बाबा निदान मुलांकरिता तरी तुम्ही दुसऱ्या लग्नाचा विचार करा, घरात बाई असेल तर तिचा मुलांना आधार होईल म्हणून रामजी बाबा यांनी रत्नागिरी मधील खेड तालुक्यातील शिरसवले गावचे सुभेदार शिरसेकर, जे सुभेदार रामजी सोबत काम करीत होते त्यांची बहीण जिजाबाई जिचा नवरा सर्पदंशाने मृत पावला होता तिच्यासोबत पुनर्विवाहाचा प्रस्ताव रामजी बाबानी शिरसेकरांजवळ मांडला व प्रस्ताव मांडत असताना आपली पहिली पत्नी तिचा मृत्यू, मुलींची लग्ने, मोठ्या मुलगा बाळारामच घर सोडून जाणे, दिव्यांग बहीण व पोरके पडलेले आनंदा व भिवा ही सर्व परिस्थिती शिरसेकर व त्यांची बहीण जिजाबाई ह्यांच्याजवळ व्यक्त करतात तेव्हा मला जरी आनंदा आणि भिवाची आई होता नाही आले तरी त्यांची दाई बनून मी त्यांचा सांभाळ करेल असे सांगून जिजाबाई लग्नास होकार देतात तेव्हा तत्कालीन पाट लावणे या प्रथेनुसार रविवारी पाट लावून सुभेदार रामजी बाबा व जिजाबाई यांचा विवाह झाला, विवाह तर झाला जिजाबाई घरात ही आल्या पण आनंदा व भिवाला काही जणांनी भडकावले की तुमचे वडील तुम्हाला सावत्र आई आणतायेत ती सावत्र आहे तुमचा छळ करेल, तुम्हाला मारहाण करेल, उपाशी ठेवील, तुमचे हाल करेल म्हणून सुरवातीपासूनच आनंदा व भिवा जिजाबाईच्या विरोधात होते पण जिजाबाईने दोघांना जमेल तितकं प्रेम दिल, त्यांना मायेने जवळ घेऊन लेकांनो मी तुमची आई आहे म्हणत त्यांना मायेने कुशीत घेतले, भिवा हा जिजाबाईचा लाडका होता, दसऱ्याच्या दिवशी सुभेदार रामजी बाबांनी जिजाबाईला सुचविले की जुन्या ट्रंकेत भिमाईच्या काही तलम साड्या व दागिने आहेत त्या तू घाल जिजाबाईही त्या साड्या व दागिने बघून हरखून गेल्या व त्या त्यांनी परिधान केल्या सर्वांना जिजाबाईच्या रुपात जणू भिमाईच उभी आहे असे वाटू लागले पण आपल्या आईची साडी व दागिने जिजाबाईने घातले यावर भिवा रागावला व भिवाने जिजाबाईसोबत भांडण करून अबोला धरला, तिच्याशी बोलणं, तिच्या हातच जेवण जेवणे बंद केलं त्यावेळी मीराआत्याने भिवाला जवळ घेऊन समजावल की जिजाबाई ही सावत्र असली तरी तुझी आई आहे तुझ्यासाठी ती किती राबते, तुझ्या आवडीच सर्व काही बनवते, जेव्हा रामजी दादा तुला मारायला आले तेव्हा जिजाबाई त्यांना आडवी आली तुझ्यामुळे तिने दादाचा मार खाल्ला, ती तुला नेहमी सर्वांपेक्षा जास्त खाऊ देते, लाड करते या अनेक गोष्टी सांगून त्यांनी भिवाच्या मनात जिजाबाई बद्दल असलेला गैरसमज दूर केले त्यामुळे भिवाच्या मनातील क्लेश दूर झाला, त्याने जाऊन जिजाबाईचे पाय पकडले तिची क्षमा मागितली व माय लेक पुन्हा प्रेमाने राहू लागले, पुढे भिवा वयात आल्यावर त्याच्या लग्नाचा विषय सुरू झाला, मुलगी ही बघण्यात आली, साखरपुडा ठरला, त्यावेळी जिजाबाई आपल्या भावंडाना आमंत्रण देण्यासाठी भायखळ्याला गेली असता वाटेत त्यांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा भेटतात त्यांच्यासोबत एक मुलगी ही असते जी जिजाबाईना पाहताक्षणीच आवडते तिच्याबद्दल विचारणा केल्यावर कळत की ती वलंगकरांची पुतणी आणि गोविंदपूरकरांची भाची रमा आहे, तिची आई रुक्मिणी व मागोमाग वडील भिकू धुत्रे (वलंगकर) यांचे निधन झाल्याने काका व मामांनी तिला भायखळ्यात आपल्याकडे आणले आहे, वलंगकरांची मुलगी जिजाबाईस मनोमन पसंत पडते व ही आपल्या भिवासाठी योग्य सुकन्या आहे असा त्या विचार करतात म्हणून त्या भावांना आमंत्रण न देताच माघारी फिरतात व घरी जाऊन रामजी बाबांना धुत्रे यांची कन्या रमाबाईचा बद्दल सांगतात, त्यावेळी साखरपुडा तोंडावर आला असताना हे काय नवीन स्थळ म्हणून रामजी बाबा व मीराताई भडकतात, परंतु रात्री रामजी बाबा विचार करतात त्यांना ही कुठेतरी जिजाबाईंचा विचार योग्य वाटतो व ते वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांना जाऊन भेटतात पण सुभेदार तुमच्या मुलाचा साखरपुडा चार दिवसांवर येऊन ठेपला आहे आणि तुम्ही हे काय म्हणताय, रामजी बाबा त्यांना समजवायचा खूप प्रयत्न करतात पण पहिल्या पसंत मुलीचा तुम्ही आधी काय तो निर्णय लावा तरच आम्ही पुढे विचार करू अस काका व मामा सांगतात तेव्हा रामजी बाबा पहिल्या पसंत केलेल्या मुलीच्या घरच्यांना ही समजावता; पंच घेऊन प्रश्न मांडतात व तत्कालीन शासन व्यवस्थेनुसार पंच रामजी बाबांना पाच रुपये दंड ठोठावतात रामजी बाबा ही खुशीने दंड भरतात व ४ एप्रिल १९०६ साली भिवा व रमाईचे भायखळा मार्केटमध्ये लग्न होते, भिवासाठी रमाईची निवड व पारख जिजाबाईने केली, म्हणून सावत्र आई जिजाबाईने खऱ्या अर्थाने भिवासाठी नववधू निश्चित केली असे प्रतिपादन नारायण जाधव यांनी वर्षावास प्रवचन मालिकेचे चौथे पुष्प गुंफत असताना केले.

बौद्धजन पंचायत समिती संलग्न संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबादप्रमाणे याही वर्षी सरसेनानी आदरणीय सभापती आनंदराज आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाने व कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत यांच्या अध्यक्षतेखाली वर्षावास प्रवचन मालिकेतील चौथ्या पुष्पाचे प्रवचन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, परेल, मुंबई – १२ येथे शनिवार दि. १७ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ७:०० वाजता मोठ्या उत्साहात संपन्न झाले. सदर प्रसंगी राष्ट्रपुरुषांना मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पमाला अर्पण करून धार्मिक पूजापाठ संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश पवार गुरुजी व सरचिटणीस मनोहर बा. मोरे गुरुजी यांनी मधुरवाणीने पार पाडला, पाहुण्यांचे स्वागत स्वागताध्यक्ष मंगेश पवार गुरुजींनी केले तर सूत्रसंचालन मनोहर बा. मोरे यांनी लाघवी शैलीत करून उपस्थितांचे मन जिंकून घेतले. सदर प्रसंगी कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, सरचिटणीस राजेश घाडगे, खजिनदार नागसेन गमरे, माजी कार्याध्यक्ष व विश्वस्त किशोर मोरे, उपकार्याध्यक्ष अशोक कांबळे, एच. आर. पवार, मनोहर सखाराम मोरे, चंद्रमनी तांबे, चिटणीस श्रीधर साळवी, संदेश खैरे, विठ्ठल जाधव, यशवंत कदम, रवींद्र शिंदे, साहित्य क्रीडा समिती अध्यक्ष राजाभाऊ गमरे तसेच अतिरिक्त सरचिटणीस, चिटणीस, व्यवस्थापक मंडळाचे सदस्य, बौद्धाचार्य, उपासक, उपासिका, महिला मंडळ आदी अनेक मंडळी उपस्थित होते. कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत यांनी कार्यक्रमाचा आढावा घेत मौलिक असे मार्गदर्शन केले, तसेच नारायण जाधव यांनी चौथे पुष्प गुंफत असताना बाबासाहेबांच्या सावत्र आई जिजाबाई यांच्यावर विस्ताराने जी मांडणी केली याबद्दल त्यांचे विशेष कौतुक करीत आभार व्यक्त केले व उपस्थितांना मंगलकामना देत शुभेच्छा दिल्या, सरतेशेवटी मनोहर सखाराम मोरे यांनी सदर कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडणाऱ्या सर्वांचे व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# लोकसभे मध्ये मांडण्यात आलेल्या वक्फ बोर्ड बिल रद्द करण्याची मागणी

किनवट /शेख शौकत :-राज्या-राज्यांतील वक्फ बोर्डांना नियंत्रित करणाऱ्या कायद्यातील बदलाचं दुरुस्ती विधेयक गुरुवारी केंद्र सरकारने लोकसभेत मांडलं. या विधेयकाला विरोधकांकडून तीव्र विरोध करण्यात आला. त्याचाच भाग म्हणून किनवटमध्ये आदिवासी विद्यार्थी कृती समितीचे महाराष्ट्र अध्यक्ष विकास कुडमते यांच्या नेतृत्वात देशाचे राष्ट्रपती द्रोपती मुर्मू यांना उपविभागीय अधिकारी किनवट यांच्या मार्फत एक निवेदन देण्यात आले ज्या मध्ये वक्फ बोर्ड बिल रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे आणि या निवेदनात महणले आहे की देशातील मुस्लिम समाजाच्या हिताकरिता वक्फ बोर्डची स्थापना करण्यात आलेली आहे. वक्फ बोडांची कार्यप्रणाली राज्यघटनेच्या अधिन आहे. त्याची कार्यपध्दती देशातील मुस्लिम समाजाच्या हिताची आहे. लोकसभेमध्ये मांडण्यात आलेल्या वक्फ बोर्ड संदर्भात बिलामुळे देशातील मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या तसेच हे बिल मुस्लिम समाजाच्या विरोधात आहे, असे दिसुन येत आहे. त्यामुळे देशातील मुस्लिम समाजात असुरक्षेतेची भावना निर्माण झाली आहे. तरी देशाचे महामहिम राष्ट्रपती यांनी हे बिल रद्द करावी ही मागणी करण्यात आली आहे. शेख नजीर ,अभय नगराळे, नवीन जाधव, राहुल कापसे, दिनेश कांबळे, निसार शेख, अकरम चव्हान, अब्दुल्ला चाउश, शेख सलाम भाई, इलियास शेख, आदींची स्वाक्षऱ्या आहेत.

# ऑनलाइन पीकपेरा नोंदणीची जाचक अट अखेर रद्द !

किनवट/शेख शौकत :-कृषि विभागाने खरीप २०२३ मधील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी हेक्टरी ५ हजार अधिकतम २ हेक्टरच्या मर्यादेत अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेत वैयक्तिक किंवा सामूहिक खातेदारांपैकी एकाला लाभ देण्यात येणार आहे. अनुदानाचा लाभासाठी शासनाने ऑनलाईन पीक पेरा नोंदीची जाचक अट घातली होती. या अटीमुळे शेतकऱ्यांवर अनुदानापासून वंचित राहण्याची वेळ आल्याचे वृत्त 'प्रकाशीत केले होते. सदर वृत्ताची दखल घेऊन शासनाने एका परिपत्रकान्वये उपरोक्त अट रद्द केल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून शेतकऱ्यांनी 'पुण्य नगरी' च्या पाठपुराव्याचे आभार मानले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाकडून खरीप २०२३ मधील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकरी बांधवांना हेक्टरी ५ हजार अधिकतम २ हेक्टरच्या मर्यादेत अनुदान स्वरूपात देण्यात येणार आहे. या योजनेसाठी वैयक्तिक खातेदार शेतकरी तसेच सामूहिक खातेदार शेतकऱ्यांपैकी एका व्यक्तीला ह्या अनुदानाचा लाभ देण्यात येणार आहे देण्यात. वैयक्तिक खातेदार शेतकऱ्यांना आधार कार्ड व संमती पत्र तर सामूहिक खातेदार शेतकरी - यांच्यासाठी आधार कार्ड, स्वसाक्षांकित केलेले झेरॉक्स प्रत, सामायिक खातेदार ना हरकत प्रमाणत्र, संमती पत्र मोबाईल क्रमांकसह कृषी सहाय्यक व इतर संबंधित अधिकाऱ्यांकडे जमा करावे लागणार आहेत. परंतु सदर अनुदानाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन पीक पेरा नोंद केलेली असणे आवश्यक असल्याची जाचक अट शासनाकडून घालण्यात आली होती. नेमकं याच एका अटीमुळे शेतकरी या अनुदानापासून वंचित राहू शकतात,अशी वृत्त पत्र ने ऑगस्टच्या महिन्यात प्रकाशीत केले होते. सदर राज्यशासनाने परिपत्रक काढून ही ऑनलाईन पिक पेऱ्याची अट शिथिल करण्यात आली असून ज्या शेतकऱ्यांणी सोयाबीन तथा कापासाची ऑनलाईन पीक पेरा नोंद केली नसेल, त्यांनी तसे हमीपत्र कृषी विभागामध्ये दिल्यास शेतकरी अनुदानास पात्र राहणार आहेत. या शासन निर्णयामुळे शेतकऱ्यांना बऱ्याच दिलासा मिळाला आहे. न सर्वांना फायदा होणार आहे, कारण शेतकऱ्यांकडे ऑनलाईन पीक पेरा नोंद करण्यासाठी लागणारा अत्याधुनिक मोबाईल सेट नसल्याने तसेच काही शेतकऱ्यांच्या शेतात मोबाईल रेंज नसल्याने त्यांनी ऑनलाईन पीक पेरा नोंद केलेली नव्हती आता अशा शेतकऱ्यांना सुद्धा या योजनेचा लाभ मिळणार आहे यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे, तसेच या ज्वलंत समस्येकडे ने लक्ष वेधल्या बद्दल शेतकऱ्यांनी वृत्त पत्रा बाबत कृतज्ञता व्यक्त केली आहे.

# आंबेडकरी विचारांच्या कार्यकर्त्यांनी आपशी मतभेद विसरून मोक्याच्या जागेचे रक्षण करावे -भगवान साळवे.

भांडुप :- मुंबई मध्ये अनेक ठिकाणी मोक्याच्या जागा कार्यकर्त्यांनी पकडून त्या ठिकाणी कार्यालय,वाचनालय काढली होती. सुरवातीला ती साधे पत्रे लावून बांधण्यात आली होती. तेव्हा कार्यकर्ते व समाज संघटित होता. त्यामुळे त्याचे कायमस्वरूपी बांधकाम करून ते लक्षवेधी आणि येणाऱ्या तरुण पिढीला प्रेरणादायी ठरत होते. राजकीय सत्ता स्पर्धेत कार्यकर्ते वेग वेगळ्या विचारांच्या नेत्या सोबत गेल्या मुळे कार्यकरत्यात मतभेद निर्माण झाले.त्याचा फायदा त्या मोक्याच्या जागा ताब्यात घेण्यासाठी भाई गिरी,दादागिरी राजकीय आशीर्वादाने वाढली. अनेक कार्यकर्ते भांडणे नको म्हणून गप्प बसले आणि समाज सुद्धा त्यामुळेच गप्प बसला.हे आपल्या क्रांतिकारी विचारांच्या चळवळीचे मोठे दुर्दव आहे. अशी खंत आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते नेते भगवान साळवे यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर एकता विकास वाचनालय केदारे चौक (गाढव नाका) भांडुप येथे ध्वजारोहण सोहळ्या प्रसंगी व्यक्त केली. भांडुप विभागातील सर्व सामाजिक,धार्मिक राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते नेते ध्वजारोहण सोहळ्याला आवर्जून उपस्थित राहिले आणि आम्ही एक आहोत एक होऊ शकतो हा संदेश यामुळेच




सर्व प्रकारचा विरोध करणाऱ्यांना गेला याचे मला समाधान वाटले असे भगवान साळवे यांनी सांगितले.एड.वैशाली सीरसाठ,सीमा इंगळे विश्वास सरदार यांच्या हस्ते ध्वजारोहण करतांना विविध पक्षांचे कार्यकर्ते आणि मान्यवर यावेळी उपस्थित होते. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विकास एकता मंच वाचनालयांचे कार्य करणारे जेष्ठ नेते प्रा. जगन्नाथ बाबा,भगवान साळवे,विजय माने,दिलीप गायकवाड, सुनील साळवे, बापू गायकवाड, बबन थोरात,चंदू बनकर,शरद वाघ त्याच बरोबर पत्रकार साहित्यिक कामगार नेते सागर तायडे,ईशान्य मुंबई जिल्हा अध्यक्ष विश्वस भाऊ सरदार,उपाध्यक्ष वंचित बहुजन आघाडीचे ईशान्य मुंबई रमेश भाई सांगारे, ज्येष्ट साहित्यिक लक्ष्मण देठे,आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ट नेते मारुती कांबळे,रिपब्लिकन सेनेचे विजय माने,वंचित चे तालुका अध्यक्ष सुभाष मांदळे,वंचित महिला आघाडी अध्यक्ष अनिता कांबळे,योगेश मोठे,चंद्रकांत गायकवाड, प्रवीण आंबोरे,सिरसाठ, गौतम मोरे कवी गायक,सीमा ताई इंगळे महिला अध्यक्ष वॉर्ड क्रमांक ११४,नागेश खैरमोडे अध्यक्ष वॉर्ड क्रमांक ११३,जितेंद्र थाटे,अनिता गायकवाड,गणेश तायडे, प्रभाकर काळे,भांगे संभाजी काशीद,नम्रता सुरवसे,उषाताई सोनवणे,लताताई नलावडे,पंचशीला आणि टेम्पो चालक मालक संघटना,फेरीवाला संघटना पदाधिकारी व सर्व नाका कामगार नाक्यावरील सर्व समाज मंडळातील आजी माजी पदाधिकारी यांच्यावतीने हा कार्यक्रम मोठ्या उत्सवात व जोश पूर्ण करण्यात आला.स्थानिक रहिवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विजय माने यांनी सूत्र संचालन केले तर जीवन खरात यांनी आभार मानले.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी पोलंड आणि युक्रेन दौऱ्यावर

नवी दिल्ली, पंतप्रधान नरेंद्र मोदी या आठवड्यामध्ये पोलंड आणि युक्रेनच्या दौऱ्यावर असणार आहेत. यामध्ये २१ आणि २२ ऑगस्ट रोजी पोलंडला तर २३ ऑगस्ट रोजी युक्रेनला भेट देणार आहेत. जवळपास ३ दशकांनंतर भारतीय पंतप्रधान युक्रेनला भेट देणार आहेत. तसेच ४५ वर्षांनंतर पोलंडला भेट देणार आहेत. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी मॉस्कोमध्ये झालेल्या भेटीनंतर एका महिन्यानंतर पंतप्रधान मोदींचा युक्रेन दौरा होत आहे. दरम्यान, पोलंडच्या दौऱ्यावर असताना पंतप्रधान भारतीय



समुदायातील लोकांशी आणि व्यावसायिकांशी संवाद साधणार आहेत. तसेच पंतप्रधान पोलंडमधील स्मारकांनाही भेट देणार आहेत. यामध्ये कोल्हापूर आणि आणि जामनगरचे ऐतिहासिक नाते आहे. युक्रेनच्या राष्ट्राध्यक्ष कार्यालयाने पंतप्रधान मोदींच्या युक्रेन दौऱ्याबाबत अधिकृत निवेदन जारी केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, आमच्या द्विपक्षीय संबंधांच्या इतिहासात भारतीय पंतप्रधानांची युक्रेनची ही पहिलीच भेट आहे. या भेटीदरम्यान, द्विपक्षीय आणि बहुपक्षीय सहकार्याच्या मुद्द्यांवर चर्चा केली जाईल, युक्रेन आणि भारत यांच्यात अनेक महत्वाच्या दस्तऐवजांवर स्वाक्षऱ्या होतील, अशी अपेक्षा आहे. असेही निवेदनात म्हटले आहे.

# अनुसूचित जाती व जमातींसाठी क्रिमी लेअर असंविधानीक सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ अधिवक्ता डॉ.के.एस.चौहान यांचे आरक्षण परिसंवादात प्रतिपादन









नागपूर / प्रतिनिधी :- दविंदर सींग विरूद्ध पंजाब राज्य या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधिशांच्या पीठाने दिलेला निर्णय हा न्यायिक प्रतिबद्धतेचे उल्लंघन करणारा आहे. विषय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना शैक्षणिक व सेवा विषयक आरक्षणामध्ये उप वर्गीकरण करणे संविधानीक रीत्या वैध आहे किंवा नाही हे ठरविणे होते.परंतु विषय वर्गीकरणाचा असताना सर्वोच्च न्यायालयाने क्रिमी लेअर लावण्याचा दिला;असे विचार सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ अधिवक्ता डॉ.के.एस. चौहान यांनी व्यक्त केले. स्वतंत्र मजदूर युनियन तर्फे हजारी पहाड नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार प्रशिक्षण केंद्र येथे आयोजित आरक्षण परिसंवादांत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी विचारमंचावर विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.सुखदेव थोरात आणि स्वतंत्र मजदूर युनियनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ.के.पी.स्वामीनाथन हे उपस्थित होते.अध्यक्षस्थानी स्वतंत्र मजदूर युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.एस.पाटील हे होते.

डॉ.के.एस चौहान पुढे म्हणाले,अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना क्रिमी लेअर लावण्याबाबतची मागणी इंदिरा सहानी या नऊ न्यायाधिशांच्या पीठाने सन १९९२ साली नाकारली आहे.असे असताना सात न्यायाधिशांचे पिठ त्याविरोधात कसा निर्णय देऊ शकते? असा प्रश्न उपस्थित केला.

भारत सरकारचे कायदा मंत्री अर्जून मेघवाल यांच्या अलिकडील विधानाचा समाचार घेताना ते म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा कायद्यामध्ये रूपांतरीत होत असतो. क्रिमी लेअर आणि वर्गीकरण याबाबतचा निर्णय केवळ बोलून त्यामध्ये सुधारणा होणार नाही; तर त्यासाठी अशाप्रकारे अनुच्छेद ३४१ व ३४२ मध्ये घटना दुरुस्ती करावी लागेल. कायदा मंत्री यांचे विधान केवळ राजकीय स्वरूपाचे असून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे मध्ये निर्माण झालेला असंतोष थांबविण्यासाठी आहे. अनुसूचित जाती मधील काही लोकांमध्ये जाणिवपूर्वक गैरसमज निर्माण करण्यात आले आहेत. त्यांचे योग्य प्रबोधन करण्याची गरज आहे.कारण पदोन्नती मधिल आरक्षण अगोदरच बंद करण्यात आले आहे व या निर्णयामुळे सरळ सेवा भरती मधील आरक्षण सुध्दा संपुष्टात येणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष व दलित आदिवासी समाजातील सामाजिक व आर्थिक प्रश्नांचे अभ्यासक डॉ.सुखदेव थोरात आपल्या प्रमुख मार्गदर्शनातून म्हणाले की,अनुसूचित जमाती व जमाती यांच्या आरक्षणाचा आधार हा जातीय भेदभाव हा आहे.अनेक अभ्यासातून समोर आले आहे की जातीय भेदभाव हा वरच्या पदावर ज्यास्त वाढतो अनुसूचित जाती व जमाती मधील अधिकाऱ्यांना कोटा वाला म्हणून हिणवले जाते.आजच्या परिस्थितीत विद्यापीठांसह वरिष्ठ पदांवर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचा अनुशेष भरलाच गेला नसताना व काही जातींचेच वरिष्ठ नोकऱ्यांमध्ये ज्यास्त प्रतिनिधीत्व आहे हे कुठल्याही वैज्ञानिक आकडेवारी द्वारे सिद्ध झाले नसताना अशाप्रकारचा निर्णय हा गैरसमजातून आधारित असल्याचे ते म्हणाले.

महिला आरक्षण हे लिंग भेदावर आधारित आहे,आर्थिक भेदभावावर नाहीतसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे आरक्षण हे अस्पृश्यता व सामाजिक भेदभाव यावर आधारित असल्याने त्याला आर्थिक आधार जोडता येत आहे,असेही डॉ. थोरात म्हणाले.प्रास्ताविक नरेंद्र जारोंडे यांनी केले संचालन गणेश उके यांनी केले तर आभार विकास गौर यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने प्राध्यापक,वकील, अधिकारी व अनेक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# चित्ररथाद्वारे 'महाज्योती'च्या योजनांची होणार जनजागृती

लातूर :- राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) मार्फत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. याबाबत जिल्ह्यात चित्ररथाद्वारे जनजागृती केली जाणार असून प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले यांनी आज या चित्ररथाला हिरवी झेंडी दाखविली. उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, उपविभागीय दंडाधिकारी रोहिणी नऱ्हे - विरोळे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे



सहायक संचालक शिवकांत चिकुर्ते यावेळी उपस्थित होते. राज्यातील इतर मगासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी, युवकांसाठी 'महाज्योती'मार्फत विविध योजना राबविल्या जात आहेत. या योजनांची जनजागृती करण्यासाठी 'महाज्योती'मार्फत चित्ररथ तयार करण्यात आला आहे. हा चित्ररथ जिल्ह्यातील ग्रामीण भागात जावून योजनांची माहिती देणार आहे.

## लातूरचा महाराजा गणेश मंडळाचा गिरवलकर मंगल कार्यालयात माजी अध्यक्ष कौतुक व गुणगौरव सोहळा

लातूर - छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील लातूरचा मानाचा गणपती म्हणून ओळख असलेल्या महाराजा गणेश मंडळाच्या वतीने माजी अध्यक्ष कौतुक व गुणगौरव सोहळा गिरवलकर मंगल कार्यालय येथे आज दिनांक १८ ऑगस्ट रोजी दुपारी बारा वाजण्याच्या दरम्यान मोठ्या थाटात संपन्न झाला. यावेळी लातूरच्या महाराजा गणपती मंडळाचे अध्यक्ष डॉ. रमेश भराटे यांच्या उपस्थितीत माजी अध्यक्ष अनुप मलवाडे, विनोद शिव प्रसाद मालू, प्राध्यापक उमाकांत होनराव, पंडित कावळे, अजित पाटील कव्हेकर, सचिन शिंदे, गणेशभैय्या एस आर काका देशमुख आदी उपस्थित होते. तसेच यावर्षीची नूतन कार्यकारणी ऋषिकेश शेंडे पाटील, पराग राम ढवे, विनोद मुळे, विष्णू भैया धायगुडे, विजय जाधव, अतुल कदम, विजयकुमार धुमाळ, योगेश आप्पा हाळी घोंगडे, राधेश्याम देशमुख यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला. या कार्यक्रमास मंडळाचे संस्थापक अध्यक्ष साईराज पवार मंडळाचे संस्थापक उपाध्यक्ष रवी ओझा मंडळाचे संस्थापक सचिव




राजेश लखादिवे मंडळाचे कोषाध्यक्ष अभिजीत पाटील मंडळाचे आधारस्तंभ सचिन मामा शेंडे पाटील, अजय कुमार बोराडे पाटील, दीपक पाटील, राजेश फडकुले, गणेश मुगळे, राहुल वाकडे, समीर मणियार,नीरज पाटील आदींची यावेळी उपस्थिती होती

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE